**महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थामध्ये सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरिता शुल्क वाढ न करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.३३/एसएम-६**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०८ मे, २०२०

**संदर्भ** : १) साथ रोग अधिनियम -१८९७
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
३) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११
४) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था शुल्क विनियमन नियम, २०१६
५) सार्वजनिक आरोग्य विभागाची अधिसूचना दिनांक १३.०३.२०२०
६) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.३३/एसएम-६ दि.३०.०३.२०२०

**प्रस्तावना :-**

जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) कोरोना विषाणू (Covid-१९) या आजारास जागतिक महामारी (Pandemic) म्हणून घोषित केलेले आहे. या आजाराच्या संसर्गाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी संदर्भ क्र. ५ अन्वये राज्यात साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ ची अमंलबजावणी राज्यात सुरु आहे. सध्या राज्यात लॉकडाऊन सुरु आहे. अशी परिस्थिती असतांना काही संस्था/शाळा, विद्यार्थ्यांना/पालकांना फीस भरण्याची सक्ती करीत असल्याबाबत तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्यामुळे उपरोक्त क्र.६ च्या परिपत्रकान्वये सर्व व्यवस्थापनाच्या शाळांना विद्यार्थी आणि पालकांकडून शाळेची चालू वर्षाची व आगामी वर्षाची फी जमा करण्याबाबत सक्ती करु नये. लॉकडाउन कालावधी संपल्यानंतर फीस जमा करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ मधील कलम (२१) अन्वये प्राप्त अधिकारान्वये तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा,कलम (२६) (i) व (l) अन्वये प्राप्त अधिकारान्वये शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय** :-

१. पालकांच्या सोईच्या दृष्टीने शैक्षणिक वर्ष २०१९-२० व २०२०-२१ मधील देय/शिल्लक फीस वार्षिक/ एकदाच न घेता मासिक/त्रैमासिक जमा करण्याचा पर्याय (option) दयावा.
२. शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ साठी कोणतीही फीस वाढ करु नये.

३. शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ साठी जर काही शैक्षणिक सुविधांचा वापर करावा लागला नाही व त्याबाबतचा खर्च कमी होणार असल्यास पालाकांच्या कार्यकारी समितीमध्ये ( EPTA) ठराव करुन त्याप्रमाणे योग्य प्रमाणात फीस कमी करावी.

४. लॉकडाऊन कालावधीत गैरसोई टाळण्यासाठी पालकांना on-line फीस भरण्याचा पर्याय (option) द्यावा

वरील आदेश सर्व बोर्डाच्या, सर्व माध्यमाच्या व पूर्वप्राथमिक ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी लागू असतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक क्र. २०२००५०८१२०१५०७४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Vandana Krishna
Date: 2020.05.08 12:06:39 +05'30'

**( वन्दना कृष्णा )**
अपर मुख्य सचिव

**प्रत,**

१. मा राज्यपाल, यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
४. मा मंत्री शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
५. मा मुख्य सचिव महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई
६. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. सर्व संचालक, शिक्षण विभाग पुणे
८. अध्यक्ष / सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
९. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांना सूचना देण्यात येते की, त्यांनी सदर शासन निर्णय सर्व शैक्षणिक संस्थाच्या निदर्शनास आणण्यात यावे.
१०. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व (माध्यमिक)
११. निवड नस्ती.